**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**जनसंपर्क विभाग**

## रसायनशास्त्र विषयाचा आऊटकम बेस्ड अभ्यासक्रम तयार होण्यासाठी राष्ट्रीय परिषदेत विचारमंथन व्हावे -कुलगुरू

## ‘करंट ट्रेन्डस इन केमिकल सायन्सेस’ विषयावरील राष्ट्रीय परिषदेचे थाटात उद्‌घाटन

अमरावती - (दि. २८.०६.२०२२)

रसायनशास्त्र विषयाच्या संशोधक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांसाठी ‘करंट ट्रेन्डस इन केमिकल सायन्सेस’ या विषयावरील राष्ट्रीय परिषद चांगले व्यासपीठ उपलब्ध झाले असून अभ्यासक्रम तयार करतांना आऊटकम बेस्ड कसा होईल ? संशोधकांसह रसायनशास्त्राचे विद्यार्थी केमिकल उद्योजक कसे निर्माण करता येतील, यावर सुद्धा या परिषदेमध्ये विचारमंथन व्हावे, असे प्रतिपादन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाला चाळीस वर्षे पूर्ण होत असल्याबद्दल, आझादी का अमृत महोत्सव, बेसिक सायन्स शाश्वास विकास आंतरराष्ट्रीय वर्ष तसेच रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. आनंद अस्वार यांच्या सेवानिवृत्ती प्रसंगानिमित्त विद्यापीठाचा रसायनशास्त्र विभाग, दि असोसिएशन ऑफ केमिस्ट्री टिचर्स (ए.सी.टी.) आणि इंडियन केमिकल सोसायटी यांचे संयुक्त विद्यमाने द्विदिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले, त्याचे उद्‌घाटनप्रसंगी अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते.

व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून डॉ.एच.एस. गौर केंद्रीय विद्यापीठ, सागरचे माजी कुलगुरू डॉ.एन.एस. गजभिये, विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. विजयकुमार चौबे, अमरावतीचे उच्च शिक्षण विभागाचे सहसंचालक डॉ.एम.बी. वाडेकर, इंडियन केमिकल सोसायटी, कोलकताचे माजी अध्यक्ष डॉ.डी.सी. मुखर्जी, स्थानिक आयोजन समितीचे अध्यक्ष डॉ. सुभाष भडांगे, संयोजक डॉ.जे.एम. बारब्दे, कार्यकारी अध्यक्ष डॉ.पी.जी. रोहणकर, आयोजन सचिव डॉ.पी.आर. मंडलिक, रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. आनंद अस्वार आदी उपस्थित होते.

सुरुवातीला परिषदेनिमित्त तयार केलेल्या स्मरणिकेचे तसेच डॉ. आनंद अस्वार यांच्या जीवन कार्याची माहिती देणाऱ्या पुस्तिकेचे विमोचन मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. पुढे बोलतांना कुलगुरू म्हणाले, डॉ. अस्वार उत्कृष्ट संशोधक व शिक्षक असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली ३१ विद्यार्थ्यांनी आचार्य पदवी संपादित केली आहे. रसायनशास्त्र विभागातील माजी विद्यार्थी देशविदेशात विविध पदांवर कार्यरत असून विद्यापीठाच्या नावलौकिकात सातत्याने भर घालत आहे. सद्य परिस्थितीचा विचार करता अभ्यासक्रमात अमुलाग्र बदल होण्याची गरज असून रसायनशास्त्र शिक्षक असोसिएशनच्या माध्यमातून रसायनशास्त्र विषयावरील पुस्तके, संशोधन, शिक्षण, अभ्यासक्रम अद्ययावत करण्यासाठी विचारमंथन होत असल्यामुळे रसायनशास्त्र विषय सातत्याने अपडेट झालेला दिसतो.

नवीन शैक्षणिक धोरण आणि सी.बी.सी.एस. पॅटर्न आम्ही विद्यापीठात लागू केला आहे. विद्यार्थ्यांना संशेधक, शिक्षक घडविण्यासह उद्योजक घडविण्याची जबाबदारी रसायनशास्त्रातील शिक्षकांना आपल्या खांद्यावर घ्यावयाची आहे. त्याकरिता रसायनशास्त्राचे विद्यार्थी उद्योजक कसे होतील, त्यादृष्टीने अभ्यासक्रमात बदल करण्याची गरज असून या परिषदेत त्यानुषंगाने सुद्धा विचारमंथन होईल, अशी अपेक्षा कुलगुरूंनी व्यक्त केली.

प्रमुख अतिथी डॉ.एन.एस. गजभिये म्हणाले, संशोधनात बेसिक सायन्सेसचे मोठे योगदान राहिले आहे. विद्यार्थ्यांमध्ये लॉजिक निर्माण करण्याचे काम त्या माध्यमातून होते. सी.बी.सी.एस. सिस्टीमची अंमलबजावणी करण्यासाठी शिक्षकांनी भरीव योगदान देण्याची आवश्यकता आहे. विद्यार्थ्यांनी आधुनिकतेची कास धरण्याची गरज असून त्यादृष्टीने आपल्यामध्ये संशोधनवृत्ती निर्माण करावी, असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले. देशभरामध्ये विविध संस्थेतर्फे रसायनशास्त्र विषयात सुरु असलेल्या विविध योजना, कार्यक्रम व उपक्रमांची माहिती देवून विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घेण्याचे आवाहन सुद्धा त्यांनी केले.

प्र-कुलगुरू डॉ. विजयकुमार चौबे म्हणाले, परिषदेत विद्यार्थ्यांचा सहभाग महत्वपूर्ण असून डॉ. अस्वार यांचे सदैव मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळत राहील. परिषदेत विषयाच्या अनुषंगाने सखोल विचारमंथन होईल. सहभागींच्या संशोधनाचे आणि विचारांचे आदानप्रदान होवून नवी दिशा सहभागींना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सहसंचालक डॉ. मुरलीधर वाडेकर यांनी सांगितले, डॉ. अस्वार यांनी रसायनशास्त्र विभागाचा व पर्यायाने विद्यापीठाचा विकास केला असून त्यांचे विद्यार्थी देशासह जगभरात कार्यरत असल्याचा अभिमान आहे, असे सांगून त्यांनी परिषदेला शुभेच्छा दिल्यात.

डॉ.डी.सी. मुखर्जी म्हणाले, रसायनशास्त्र विषयाचे समाज व देश विकासामध्ये महत्वाचे स्थान आहे. या विषयावर संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांनी संशोधनाची खोली वाढविण्याची गरज असून त्यादृष्टीने उदयोन्मुख संशोधक आपले योगदान देतील, असे सांगून सहभागींसाठी ही परिषद फलदायी ठरेल, असे ते म्हणाले. याप्रसंगी सत्कारमूर्ती डॉ. आनंद अस्वार यांनी मनोगत व्यक्त करतांना रसायनशास्त्र विभागाने केलेल्या शैक्षणिक कार्यावर प्रकाश टाकला. विभागाच्या विकासाविषयी त्यांनी माहिती देवून राष्ट्रीय परिषद आयोजनामागील भूमिका मांडली.

विद्यापीठ गीताने सुरु झालेल्या परिषदेमध्ये मान्यवरांचे हस्ते कर्मयोगी संत गाडगे बाबा व माता सरस्वती यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण व दीपप्रज्वलन करण्यात आले. याप्रसंगी शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह व वृक्ष देवून मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय डॉ. जागृती बारब्दे, संचालन डॉ. अंजली बोदडे व डॉ. रेणू वसु यांनी, तर आभार डॉ.पी.आर. मंडलिक यांनी मानले. परिषदेत देशभरातील २५० चे वर प्रतिनिधी सहभागी झाले असून दोन दिवस ही परिषद चालणार आहे.

---

प्रति,

**जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी

दि. २८/०६/२०२२.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी

This document was created with the Win2PDF “Print to PDF” printer available at

https://www.win2pdf.com

This version of Win2PDF 10 is for evaluation and non-commercial use only.
Visit https://www.win2pdf.com/trial/ for a 30 day trial license.

This page will not be added after purchasing Win2PDF.

https://www.win2pdf.com/purchase/